# विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित

## महिला कला—वाणिज्य महाविदयालय चांदुर— रेल्वे जि. अमरावती

## करियर कट्टा उपक्रमातर्गत

## कार्यक्रमांचा अहवाल

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विदयमाने आकारास आलेला करियर कटा हा विदयार्थी केंद्र बिंदू मानुन त्यांच्या सर्वागीण विकासासाठी महाविदयालयीन पातळीवरील काम करणारा एक महत्त्वाचा उपक्रम आहे.

महाराष्ट माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि महाराष्ट राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या निर्देशानुसार या उपक्रमाचे आमच्या महाविदयालयात दिनांक ०७ एप्रिल, २०२२ रोजी करण्यात आले. यावेळी उदघाटक म्हणून श्री. जितेंद्र जाधव (उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन चांुदर रेल्वे ) यांच्या हस्ते या उपक्रमाचे उदघाटन करण्यात आले. त्यांनी उपस्थित विदयार्थीनींना स्पर्धा परिक्षेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

त्यानंतर दिनांक २५ एप्रिल, २०२२ रोजी 'स्पर्धा परिक्षेची तयारी कशी करावी?' याविषयावर नीता तागडे (सहायक पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन, चांदुर रेल्वे) यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी उपस्थित विदयार्थीनींना स्पर्धा परिक्षा तयारी विषयी कोणत्या पुस्तकांचे वाचन करावे या संबधी सविस्तर मार्गदर्शन केले.

दिनांक ०५ ऑगष्ट, २०२२ रोजी महाविदयालयातील 'करियर कट्टा' या उपक्रमाच्या समन्वयक प्रा. अनिता एस. धुर्वे यांनी 'करियर कट्टा' संबंधी सविस्तर माहिती दिल्यानंतर या उपक्रमात सहभागी होण्यासाठी नोंदणी—प्रक्रिया कशी पार पाडावी? या संबधीची रीतसर माहिती दिली.

या पार्श्वभूमीवर दि. ०२ सप्टेंबर, २०२२, पर्यत 'करियर कट्टा' या उपक्रमात एकूण १४ मुलींनी त्यांचा सहभाग नोंदविला होता. तसेच, Ad on course आणि पोलिस प्रशिक्षण यासाठी १४ मुलींनी आपला सहभाग नोंदविलेला होता.

शैक्षणिक सत्र २०२३—२०२४ या सत्रात महाविदयालयात 'करियर संसदची' स्थापना करण्यात आलेली असून त्या संसदेची कार्यकारिणी खालील प्रमाणे आहे.

**मुख्यमंत्री—** **कु. निर्जला वासनिक**
**नियोजनमंत्री—** **कु. साक्षी यावले**
**कायदे व शिस्तपालनमंत्री—** **कु. लक्ष्मी गेडाम**
**सामान्य प्रशासनमंत्री—** **कु. भावना बजाज**
**माहिती व प्रसारणमंत्री—** **कु. हर्षा बावनथडे**
**उदयोजकता विकासमंत्री—** **कु. काजल शहारे**
**रोजगार स्वयंरोजगारमंत्री—** **कु. आचल कोडापे**
**कौशल्य विकासमंत्री—** **कु. राणी माने**
**संसदीय कामकाजमंत्री—** **कु. राजश्री पांडे**
**सदस्य—** **कु. कल्याणी श्रीवास**

या संसदेचे दि. १८ ऑगष्ट, २०२३ रोजी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांच्या अध्यक्षतेखाली उदघाटन करण्यात आले. यावेळी 'करियर कट्टा' चे महत्व आणि 'करियर संसदेचे' कार्य यासंबंधीचे मार्गदर्शन करियर कट्टाच्या समन्वयक प्रा. अनिता एस. धुर्वे यांनी केले. याप्रसंगी 'करियर कट्टा'च्या १० मुली उपस्थित होत्या.

चालू शैक्षणिक सत्रात महाविदयालयाचा माहिती पत्रकात या उपक्रमासंबंधी माहिती देण्यात आलेली असून आता पर्यत एकूण १० (दहा) विदयार्थीनींचे प्रवेश निश्चित झालेले आहेत. तसेच, त्यांचे नोंदणी शुल्क रू ३६५०त्यांनी समन्वयकाकडे जमा

केलेले आहे. या उपक्रमात महाविदयालयातील अधिकाधिक विदयार्थीनींचा सहभाग व्हावा यासाठी समन्वयक प्रा. अनिता एस. धुर्वे प्रयत्नशील आहेत





महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग
आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
करिअर कट्टा